# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

महाराष्ट्र शासन अधिसूचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशि–४ महाराष्ट्र अधिनियम, १९९४ (१९९४ चा महा. ३५) या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापीत राज्य विद्यापीठ

(विद्या विभाग )

एम.आय.डी.सी. रोडकॉम्प्लेक्सगडचिरोली– ४४२६०५ फोन:०७१३२ – २१६५५४, २२३१०४,२२३३२३

जा.क्र/गोविग/विद्या/२२८/२०१९ दिनाक: १४/०५/२०१९

## अधिसुचना

गोंडवाना विद्यापीठाशी सर्व संलग्नित महाविद्यालयांना कळविण्यात येते की, मा. उच्च शिक्षण महाराष्ट्र राज्य पुणे यांचे दिनांक ५/४/२०१९ रोजीच्या पत्रानुसार, विद्यापीठ/महाविद्यालय स्तरावर मराठी साहीत्य व संस्कृती संवर्धनाचे उपक्रम राबविणेबाबत कळविण्यात आलेले आहे. तसेच महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ, अधिनियम २०१६ मधील कलम ५ (६४) तरतुदी अंतर्गत संलग्नित पत्रानुसार सर्व महाविद्यालयांना त्यानुसार कार्यवाही घेवुन राबविण्यात आलेल्या उपक्रमाचा अहवाल विद्यापीठास सादर करावयाचे आहे, तरी सर्व प्राचार्य/विभाग प्रमुख यांनी शिक्षण संचालक (उच्च विभाग) यांच्या पत्रानुसार यथायोग्य कार्यवाही करावी.

(दिपक जुनघरे)
उपकुलसचिव
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
कुलसचिवांचे कार्यालय
आवक क्र. ...... दि. ............
जावक क्र. 3717 12/4/19

गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
विद्या विभाग
आवक क्र. 188 दि. 12/4/19
जावक क्र. दि. ..........

महाराष्ट्र शासन
शिक्षण संचालनालय(उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, पुणे-४११ ००१.

www.dhepune.gov.in Email- vishi.dhepune@nic.in
फोन नं.०२०/२६१२२११९,२६०५१५१२,२६१२४६३९ फॅक्स ०२०/२६१११९५३

क्रमांक- युएनआय/(४७/१९)/अधी.३/विशि-१/ ५६६३ दिनांक- 05 APR 2019

प्रति,

कुलसचिव,
सर्व अकृषी विद्यापीठे,
महाराष्ट्र राज्य.

**विषय- महाविद्यालय व विद्यापीठात मराठी साहित्य व संस्कृती संवर्धनाचे उपक्रम राबविणेबाबत.**

संदर्भ- शासनाचे क्रमांक संकीर्ण-२०१९/प्र.क्र.५७/विशि-३
दिनांक २७ मार्च, २०१९

उपरोक्त विषयाबाबतचे शासनाचे पत्र व सहपत्रे सोबत जोडली आहेत, कृपया अवलोकनी घ्यावीत.

वरील संदर्भिय पत्रानुसार कळविण्यात येते की, श्री.लक्ष्मीकांत देशमुख, अध्यक्ष अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन, २०१८ यांनी मा.मंत्री उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांना लिहिलेल्या पत्रामध्ये मराठी साहित्य व संस्कृती संवर्धनाचे उपक्रम राबविणेबाबत कळविलेले आहे.

या अनुषंगाने महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील प्रकरण २ मधील कलम ०४ मध्ये विद्यापीठांची उद्दिष्टे यामधील(१२) मध्ये वेगवेगळे धर्म, साहित्य, इतिहास, विज्ञान आणि कला, सभ्यता व संस्कृती यांच्या अभ्यासामार्फत राष्ट्रीय एकात्मता, बंधुता वाढीस लागणे आणि सांस्कृतिक वारसा जतन करणे तसेच भारतातील विभिन्न धर्म व विविध संस्कृती यांच्या प्रती आदर वृध्दिंगत करणे; अशी तरतूद नमूद केलेली आहे.

तसेच महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील कलम ५ मध्ये विद्यापीठाचे अधिकार व कर्तव्ये नमूद केलेली असून त्यामधील उपकलम ६४ मध्ये विद्यापीठाने स्वत: किंवा इतर विद्यापीठाच्या सहकार्याने, राज्य शासनाच्या धोरणाचे अनुपालन करण्यासाठी मराठीचा अभ्यासक्रम आणि शिक्षण, अभ्यास, संशोधन व परीक्षा यांचे माध्यम म्हणून मराठीचा वापर करण्यास चालना देणे अशी तरतूद नमूद केलेली आहे.

तसेच या पत्रामध्ये श्री.लक्ष्मीकांत देशमुख, अध्यक्ष अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन, २०१८ यांनी मराठी वाङःमय मंडळाच्या कामकाजाची रुपरेषा व कृती कार्यक्रम व या कार्यक्रमाची देखरेख यंत्रणा इत्यादी बाबी पत्रात नमूद केलेल्या आहेत. त्यामुळे महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ च्या कलम ६४ चे यथोचित पालन होऊन कॉलेज विद्यार्थी हे बहुश्रुत वाचक होतील. तसेच कॉलेजची ग्रंथालये वाङःमय मंडळाचा केंद्रबिंदू असल्यामुळे ती सुसज्ज व चैतन्यमय ज्ञानकेंद्रे होतील. तरुणाची अभिव्यक्ति मराठीत जोमाने होईल. तसेच विद्यार्थी बहुश्रुत व ज्ञानसंपन्न अवांतर वाचनाने होतील.

या अनुषंगाने राज्यातील सर्व अकृषी विद्यापीठांना या संदर्भात महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील उद्दिष्टांमध्ये व कलम ५(६४) मध्ये या संदर्भातील तरतूद नमूद केलेली असून त्यामधील तरतूदीनुसार तसेच वर नमूद केलेल्या परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे उचित कार्यवाही करावी.

(डॉ.विजय नारखेडे)
सहसंचालक, उच्च शिक्षण,
महाराष्ट्र राज्य, पुणे-१.

प्रत- श्री.नि.अ.पांढरकामे, अवर सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई-३२ यांना माहितीस्तव सादर.

संचालनालय
(उच्च शिक्षण)
पुणे-४११००१.
30 MAR 2019
आवक क्रमांक:- ६६००
विशि

महाराष्ट्र शासन

क्रमांक: संकीर्ण २०१९/प्र.क्र. ५७/विशि-३,
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक: २७ मार्च, २०१९

प्रति,

संचालक,
उच्च शिक्षण,
पुणे.

विषय :- महाविद्यालय व विद्यापीठात मराठी साहित्य व संस्कृती संवर्धनाचे उपक्रम राबविणेबाबत...

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने कार्यासन अधिकारी, समन्वय, उच्च व तंत्रशिक्षण विभाग यांचे दि. २२.११.२०१८ चे पत्र शासनास प्राप्त झाले आहे. सदर पत्राची प्रत सोबत जोडत आहे.

सदर पत्राच्या अनुषंगाने आवश्यकती कार्यवाही करुन याबाबतचा अहवाल तात्काळ शासनास सादर करण्यात यावा.

(नि.अ.पांढरकामे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

महाराष्ट्र शासन

क्रमांक : संकीर्ण-२०१८/(प्र.क्र.७४/१८)/समन्वय.
उच्च व तंत्र शिक्षण विभाग.
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक.
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : २२.११.२०१८.

प्रति,

सर्व सह/उप सचिव,
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.

विषय : महाविद्यालय व विद्यापीठात मराठी साहित्य व संस्कृती संवर्धनाचे उपक्रम राबविणेबाबत.

महोदय/महोदया,

वरील विषयाबाबत अध्यक्ष, अ.भा.मराठी साहित्य संमेलन २०१८, यांचे दि. २५.१०.२०१८ चे पत्र सोबत जोडले आहे.

२. उपरोक्त पत्रान्वये महाविद्यालय व विद्यालयात मराठी साहित्य व संस्कृती संवर्धनाचे उपक्रम राबविणेकरीता, वाचन संस्कृती रुजविण्याकरीता दिलेल्या उपाययोजनांची अंमलबजावणी करण्याबाबतचे आदेश अधिनस्त कार्यालयांना देण्यात यावेत, ही विनंती.

आपला,
२२.११.२०१८
(प्र. ह. कदम)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन.

सहपत्र : वरीलप्रमाणे.

प्रत : संग्रहार्थ.

DHE UWO

प्रति,

मा. मंत्री,

शालेय शिक्षण, उच्च शिक्षण तथा

मराठी भाषा विभाग,

मंत्रालय, मुंबई.

विषय - मराठी साहित्य व संस्कृती संवर्धनाचे उपक्रम राबविणेबाबत.

या सोबत एक टिपणी दोन प्रतीत जोडली आहे, तिचा विषय आहे - ( महाविद्यालय व विद्यापीठात वाचन संस्कृती रुजविण्यासाठी ... शासन परिपत्रक जारी करणे )

हा विषय उच्च शिक्षण विभागाशी संबंधित आहे. दिनांक २५/१०/२०१८ रोजी झालेल्या बैठकीत निर्णय झाल्याप्रमाणे या बाबत उचित कार्यवाही करण्यासाठी उच्च शिक्षण विभागाच्या प्रधान सचिवांना आपण योग्य ते निर्देश द्यावेत ही विनंती.

आपला विश्वासू,

(लक्ष्मीकांत देशमुख)

अध्यक्ष, अ.भा.मराठी साहित्य संमेलन

२०१८

अ/सत्वर

प्रधान सचिव, उच्च शिक्षण, मंत्रालय, मुंबई

26/10/18

महाविद्यालय व विश्वविद्यालयात वाचन संस्कृती रुजवण्यासाठीच्या

उपाययोजनांची टीपणी / प्रारूप

१. प्रस्तावना

सजग, चोखंदळ व विचार करणारा वाचकवर्ग ज्या समाजात विपुल असतो, तो समाज निकोप व निरोगी असतो. तिथे लोकशाही जिवंत व संवादी राहते. असा वाचकवर्ग निर्माण करण्यासाठी जिवंत व चैतन्यमय वाचनसंस्कृती निर्माण करावी लागते. मराठीचा विचार केला तर, ती पुरेशा प्रमाणात रुजली नाही, हे वास्तव आहे. मराठी भाषा व साहित्याचा प्रसार व वाढीसाठी महाविद्यालयीन व विश्वविद्यालयीन विद्यार्थ्यांत वाचनसंस्कृती रुजविण्यासाठी विशेष प्रयत्न, तेही कल्पकतेने राबवण्याची गरज आहे.

२०१८ च्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचा अध्यक्ष या नात्याने पुढाकार घेत साहित्य परिषद व विद्यापीठाच्या संयुक्त विद्यमाने काही उपाययोजना उभयतांच्या सहमतीने करण्याचे प्रस्तावित आहे.

२. वाचनसंस्कृतीसाठी वाङ्मय मंडळ स्थापन करणे

महाराष्ट्रात अनेक महाविद्यालयात मराठी वाङ्मय मंडळे आहेत, पण जिथे कला विभाग / शाखा नाही, त्या महाविद्यालयात ती नसतता. पण मराठी भाषकांच्या महाराष्ट्र राज्यातील प्रत्येक महाविद्यालयात विद्यार्थी हा चोखंदळ वाचक व्हावा व मराठी भाषा- मराठी संस्कृतीसाठी त्याने/तिने योगदान द्यावे यासाठी विद्यापीठ परिपत्रक काढून वा अन्य पद्धतीने त्यांच्या कार्यक्षेत्रात येणाऱ्या सर्व कला, वाणिज्य, विज्ञान, विधी, शारीरिक शिक्षण, व्यवस्थापन व अभियांत्रिकी आदी महाविद्यालयात जिथे प्रामुख्याने मराठी भाषिक विद्यार्थी असतात, तिथे मराठी वाङ्मय मंडळ स्थापन करण्याचा आदेश द्यावेत व त्याची अंमलबजावणी २०१८-१९ च्या शैक्षणिक वर्षात सुरू करावी. त्यासाठी 'महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे अधिनियम २०१६' कायद्याचे कलम (६४) विद्यापीठाला अशा उपाययोजना करण्यासाठी बंधनकारक करते. ते कलम असे आहे;

(६४) विद्यापीठाने स्वतः किंवा इतर विद्यापीठाच्या सहकार्याने राज्य शास्नाच्या धोरणाचे अनुपालन करण्यासाठी मराठीचा अभ्यासक्रम आणि शिक्षण, अभ्यास, संशोधन व परीक्षा यांचे माध्यम म्हणून मराठीचा वापर करण्यास चालना देणे.

यात शिक्षण व अभ्यासक्रमांतर्गत अवांतर वाचन येते हे उघड आहे. अभ्यासक्रमाव्यतिरिक्त ललित व ललितेतर (ज्ञान व माहिती) साहित्य विद्यार्थ्यांनी वाचणे हे व्यापक अर्थाने राष्ट्र उभारणीसाठी चालना देणारे शिक्षण होय. त्यामुळे प्रत्येक महाविद्यालयात मराठी वाङ्मय मंडळ स्थापन होणे, मराठीच्या राज्यशासनाच्या धोरणाला पूरक ठरते. म्हणून त्यांची स्थापना करण्यात यावी. त्याचा केंद्रबिंदू कॉलेजचे ग्रंथालय व भाषाप्रेमी प्राध्यापक करतील.

## ३. मराठी वाङ्मय मंडळाच्या कामकाजाची रूपरेषा व कृती कार्यक्रम

प्रत्येक महाविद्यालयाने विद्यार्थी परिषदेची ज्या पद्धतीने निवडणूक होते, त्याप्रमाणे किंवा अन्य पद्धतीने मराठी वाङ्मय मंडळाचे अध्यक्ष व दहा सदस्य (पाच मुले व पाच मुली) निवडावेत. हे मंडळ जुलै-ऑगस्टमध्ये कार्यान्वित व्हावे व पूर्ण शैक्षणिक वर्षात मंडळाने किमान सहा कार्यक्रम घ्यावेत, असे परिपत्रकाद्वारे आदेशीत करून त्यात दरवर्षी एका साहित्यिकाला बोलावून उद्घाटन करणे व त्यांच्या समावेश साहित्यिक संध्याकाळ संपन्न करणे, कथाकथन, कविता वाचन/ गायन कार्यक्रम, साहित्यिक वार्षिकांक, साहित्यिकांची व्याख्याने / मुलाखती, कॉलेजस्तरावर लेखनस्पर्धा आणि दोन दिवसांचे महाविद्यालयीन स्तरावरचे विद्यार्थ्यांचे साहित्य संमेलन घेणे, तसेच विकली बुकक्लब असे उपक्रम घेता येतील. त्यासाठी विद्यापीठातील मराठी विभागाने काम करावे व वाङ्मय मंडळासाठी दरवर्षी किमान १५-२० नवे कार्यक्रम सुचवावेत, ते किंवा अन्य उपक्रम कॉलेजच्या वाङ्मय मंडळाने राबवावेत. त्यासाठी साहित्य परिषद संसाधन संस्था (रिसोर्स इन्स्टिट्यूट) म्हणून काम करेल. त्यासाठी विद्यापीठाशी सांमजस्य करार करून प्रत्येक महाविद्यालयातील वाङ्मय मंडळाने चैतन्यमय रीतीने चालून विद्यार्थ्यातून चांगले वाचक व लेखक-कवी निर्माण होतील. याच्या जोडीने हे वाङ्मय मंडळा एकांकिका- नाटके दरवर्षी बसवेल, तसेच चित्रपट रसस्वाद कार्यशाळा, सर्जनशील लेखन कार्यशाला आदी उपक्रम राबवू शकेल.

४. अंमलबजावणीसाठी देखरेख यंत्रणा

विद्यापीठाचा मराठी विभाग मार्गदर्शन, देखरेख व पर्यवेक्षण करेल. त्याला तसे प्राधिकृत करावे व एका प्राध्यापकाकडे ही जबाबदारी द्यावी. तसेच वर्षभरात दोनदा महाविद्यालयाकडून झालेल्या कामाचा लेखी अहवाल मागवावा. तसेच दरवर्षी शैक्षणिक वर्षाच्या प्रारंभी प्रत्येक कॉलेजच्या वाङ्मय मंडळाचा अध्यक्ष व दोन प्रतिनिधी (एक महिला आवश्यक) आणि कॉलेजच्या मराठी विभाग प्रमुख किंवा जिथे मराठी विभाग नाही तिथे प्राचार्य प्राधिकृत प्राध्यापकांची मराठी विभागाने साहित्य परिषदेच्या मदतीने मार्गदर्शनासाठी व उपक्रमासाठी त्याची उत्तम आखणी व अंमलबजावणीसाठी एक दिवसीय कार्यशाळा घ्याव व वर्षभर देखरेख करावी.

५. अपेक्षित फलश्रुती

- महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे अधिनियम २०१६च्या कलम (६४)चे यथोचित पालन.
- कॉलेज विद्यार्थी बहुश्रुत वाचक होतील.
- कॉलेजची ग्रंथालये वाङ्मय मंडळाचा केंद्रबिंदू असल्यामुळे ती सुसज्ज व चैतन्यमय ज्ञानकेंद्रे होतील.
- तरुणाईची अभिव्यक्ती मराठीत अधिक जोमाने होईल.
- विद्यार्थी बहुश्रुत व ज्ञानसंपन्न अवांतर वाचनाने होतील.

सादर कर्ता

लक्ष्मीकांत देशमुख, आय. ए. एस. (नि)

अध्यक्ष,

अ.म. साहित्य संमेलन २०१८